**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २१३ । सोमवार १८ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## कोठल्यातील क्लबवर कारवाई न केल्यास पोलिस अधीक्षकांच्या दालनात ठिय्या मांडणार

### भार्गव पानसरे यांचा पोलिसांना इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कोठला येथील जुगाराच्या क्लबवर तातडीने कारवाई अशी मागणी भार्गव पानसरे यांनी केली आहे.या क्लबवर कारवाई न केल्यास पोलिस अधीक्षकांच्या दालनात ठिय्या आंदोलन करणयाचाही इशारा यानिमित्ताने पानसरे यांनी दिला आहे.

पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्या पदभार घेतल्यावर अनेक ठिकाणी छापे टाकण्यात आल्यावर अवैध व्यावसायीक बंद करण्यात आले परंतु गेल्या काही दिवसांपासून कोठला येथे जुगाराचा क्लब पुन्हा चर्चेत आला असून येथे तातडीने कारवाई करण्यात यावी अन्यथा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या दलानात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### कोणाच्या आशिर्वाने जुगाराच्या क्लब रिलॅक्स

कोतवाली हद्दीतील जुगाराच्या क्लवर क्रॉस रेड करण्यात आल्या नंतर अनेक क्लब चालकांचे धाबे दणाणुन गेले होते. परंतु जाणीवपुर्वक दर्लक्ष केले जात असल्याने कोणत्या पोलिसांच्या आशीर्वादाने हा जुगारा क्लब रिलॅक्स चालू आहे असा या निमित्ताने प्रश्न उपस्थित होत आहे. कोठला येथे यापुर्वी तत्कालीन पोलिस उप अधीक्षक संदीप मिटके यांच्या कारवाईने अनेकांची तोतेगीरी उघड झाली होती. त्यामुळे येथील जुगार अड्डयाचा गाशा गुंडाळण्यात आला होता. परंतु आता पुन्हा येथे जुगाराचा क्लब सुरु झाल्याने एक प्रकारे थेट एसपी सुदर्शन यांनाच आव्हाण दिले जात आहे काया असाही यानिमित्ताने प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे येथील जुगाराच्या क्लबवर एलसीबी अथवा स्थानिक पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी कारवाई न केल्यास थेट पोलिस अधीक्षक सुदर्शन यांच्या दालनात ठिय्या आंदालन करण्यात येईल असाही इशारा या निमित्ताने पानसरे यांनी दिला आहे.

### टिपरसे साहेब क्रास रेड थांबल्या का?

पोलिस अधीक्षक सुदर्शन यांनी पदभार स्विकारल्यानंतर उपअधीक्षक दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाली येथे जुगाराच्या क्लबवर आणि एमआयडी येथे बिंगो जुगाराच्या अड्डयांवर छाप टाकून कारवाई करण्यात आली होती. परंतु त्यांनतर ही कारवाई थंडवली आहे. टिपरसे साहेब आता पुन्हा क्रॉस रेडचा हिसका दाखवा अशीही मागणी पानसरे यांनी केली आहे.



युवा नेतृत्व, श्री.विवेकभैय्या कोल्हे यांची विधान परिषदेच्या आमदारपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार व सन्मान करत भावी वाटचालीस शुभेच्छा देतांना खा. डॉ. निलेशजी लंके.

### वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या निषेधार्थ

## महावितरणाच्या अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा राष्ट्रवादीचा इशारा

### उन्हाळ्यात अधिकारी स्वत:ची काळजी घेतात, जनतेची कधी घेणार? – संपत बारस्कर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शहरामध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता विद्युत विभागाच्या वतीने वारंवार वीज पुरवठा खंडित केला जात असल्यामुळे भर उन्हाळ्यात नागरिक त्रस्त झाले आहेत. दिवसा आणि रात्री सतत होणाऱ्या वीजखंडितीमुळे नागरिकांना उष्माघाताचा त्रास सहन करावा लागत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांचे मोठे हाल होत आहेत. वारंवार लाईट जात असल्यामुळे व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत असून शहराचा पाणीपुरवठाही विस्कळीत होत आहे. या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महावितरण विभागाविरोधात आंदोलन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांना निवेदन देत येत्या आठ दिवसांच्या आत वीज पुरवठ्याबाबत ठोस उपाययोजना न केल्यास कोणत्याही क्षणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अधिकाऱ्यांना काळे फासण्यात येईल, असा तीव्र इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी अधीक्षक अभियंता रमेश कुमार पवार यांना निवेदनाद्वारे दिला.

यावेळी नगरसेवक कुमारसिंह वाकळे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, प्राध्यापक माणिक विधाते, संभाजी पवार, साधना बोरुडे, रोहिणी अंकुश, सागर गुंजाळ, सुरज कोतकर, सुरत शिंदे, दीपक खेडकर, नितीन घोडके, रणजीत सत्रे, मनोज नन्नवरे, दीपक गांगर्डे, मारुती पवार, ऋषिकेश ताठे, शैलेश मते आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपत बारस्कर म्हणाले की, अहिल्यानगर शहरामध्ये दिवस–रात्र कोणतीही पूर्वसूचना न देता वीज पुरवठा खंडित केला जात आहे. भर उन्हाळ्यात नागरिक त्रस्त झाले असून अधिकारी मात्र एसी कार्यालयात बसून स्वत:ची काळजी घेत आहेत. जनतेच्या हालअपेष्टांकडे दुर्लक्ष केले जात आहे. लाईट गेल्यामुळे व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत असून पाणीपुरवठाही विस्कळीत होत आहे. नागरिकांनी वीजबिल एक दिवस जरी भरले नाही तर महावितरण विभाग तत्काळ कनेक्शन कट करतो. मात्र वारंवार होणारी ट्रिप लाईट सुरू करण्यासाठी विभागाकडे वेळ नसतो. त्यामुळे हा सर्व प्रकार जाणीवपूर्वक होत असल्याचे दिसून येते.

■ पान ४ वर

## अल्पवयीन पीडितेवर अत्याचार, भोंदूबाबास दहा वर्षे सक्तमजुरी

### जिल्हा न्यायालयाचा निकाल । काळी जादू व पैशांचा पाऊस पाडण्याचे आमिष

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तू माझी बायको आहेस, घरी नांदायला चल नाहीतर काळी जादू करून तुझे सर्व कुटुंब उदध्वस्त करून टाकेल, अशी धमकी देऊन अल्पवयीन पीडितेवर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी जिल्हा न्यायालयाने भोंदूबाबाला दहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे. महादेवनाथ बाबा उर्फ ज्ञानदेव तुकाराम कांबळे (वय ४२ वर्षे, रा.शिर्सफळ, आटोळे वस्ती, ता. बारामती, जि. पुणे) असे शिक्षा झालेल्या भोंदूबाबाचे नाव असून, पाच वर्षांपूर्वी झालेल्या या घटनेबाबत पारनेर पोलीस ठाण्यात अल्पवयीन पीडितेने फिर्याद दिली होती.

सदर घटनेची थोडक्यात हकिकत अशी की, पीडिता व तिचे वडील यांना या भोंदूबाबाने मी देवऋषी असून अडचणी असल्यास व भविष्य पाहून त्याचे निवारण करतो असे भासवले. पीडितेच्या घरातील लोकांचे आजारपण ■ पान ४ वर

### याप्रमाणे ठोठावली शिक्षा

या खटल्याची अंतिम सुनावणी तदर्थ जिल्हा न्यायाधीश श्रीमती एम. एस. भदाणे यांच्यासमोर होऊन न्यायालयाने भोंदूबाबास भादंवि. कलम ३७६ (२) (एन) ३५४ (अ), ५०६, ४२० सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रकार व जादुटोणा यांना प्रतिबंध करणेकरिता व त्यांचे समूळ उच्चाटनाकरिता अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे दोषी धरून भादंवि कलम ३७६ (२)/एन प्रमाणे १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा तसेच २५ हजारांचा दंड, दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद, भादंवि कलम ४२० प्रमाणे पाच वर्षे सक्तमजुरी व १० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना साधी कैद, भादंवि कलम ५०६ अन्वये दोन वर्षे सक्तमजुरी व २ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास पंधरा दिवस साधी कैद, कलम ३५५ अ अन्वये एक वर्षे सक्तमजुरी व १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सात दिवसाची साधी कैद सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रकार व जादूटोणा यांना प्रतिबंध करणेकरिता व त्यांचे समूळ उच्चाटनाकरिता अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे पाच वर्षे सक्तमजुरी व ५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिन्याची साधी कैद, अशी शिक्षा ठोठावली. सर्व शिक्षा एकत्रित भोगायच्या आहेत.

### एकूण ११ साक्षीदार तपासले

तपासी अधिकारी उपनिरीक्षक एच. एन. उगले यांनी तपास करून करून आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. यामध्ये अल्पवयीन पीडिता तसेच तिचे वडील, पंच साक्षीदार, तपासी अधिकारी असे एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले. वैदयकीय अधिकारी पारनेर यांची साक्ष महत्वाची ठरली. सदर खटल्याचे कामकाज जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखील अतिरिक्त सरकारी अभियोक्ता अनिल देवराम ढगे यांनी पाहिले. त्यांना पीएएआय. संजय चव्हाण, पैरवी अधिकारी पोकॉ आर.डी. आडसुळ, यांनी सहकार्य केले.

## राहुरीत अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने राहुरी शहरात वाळूची अवैध वाहतूक करणा–यांविरुद्ध कारवाई करून एकूण ३ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक १७ रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक राहुरी परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, राहुरी शहरातील १८ एकर परिसरात एक इसम टेम्पोमध्ये चोरुन वाळूची वाहतूक करत आहे. त्यानुसार पथकाने तात्काळ राहुरी शहरातील १८ एकर परिसरात सापळा रचून संशयित टेम्पो थांबवला. त्यात दोन ब्रास वाळू आढळून आली. टेम्पोचालक अकील कासम पठाम (वय– २८ वर्षे रा.देसवंडी ता. राहुरी) यास ताब्यात चौकशी करता त्याने टेम्पोमालकाचे नाव ओमकार संजय तनपुरे (रा. तनपुरवाडी ता.राहुरी) असे असल्याचे सांगितले

आरोपीकडून वीस हजार रुपये किमतीची दोन

■ पान ४ वर

### जमिनीच्या वादातून महिला अंगणवाडी मदतनीसाला

## पती व सावत्र मुलाकडून बेदम मारहाण!

### दागिने आणि मोबाईल हिसकावून जीवे मारण्याची धमकी अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात उपचार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे जमिनीच्या वादातून एका ५२ वर्षीय महिला अंगणवाडी मदतनीसाला तिच्याच पती, सावत्र मुलगा, पुतण्या आणि एका अनोळखी इसमाने शेतात घुसून लाकडी दांडके व लोखंडी पान्ह्याणे निर्घृण मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या सौ. संगिता बाबाजी जांभळकर (वय ५२, रा. वडगाव सावताळ) यांच्यावर अहिल्यानगर येथील हराळ हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून, त्यांनी पोलिसांत जबाब नोंदवला आहे.

फिर्यादी संगिता जांभळकर या वडगाव सावताळ येथे एकट्या राहून भोंद्र येथे अंगणवाडी मदतनीस म्हणून काम करतात. त्यांचे पती बाबाजी जांभळकर यांनी दुसरे लग्न केले असून ते जवळच राहतात. पतीने संगिता यांना उदरनिर्वाहासाठी गट नंबर ७९६ मध्ये दीड एकर जमीन दिली आहे, तर उर्वरित जमिनीच्या वाटपाचा दावा पारनेर कोर्टात सुरू असल्याने त्यांच्यात वाद आहे.

दिनांक १४ मे २०२६ रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास संगिता या शेतात असताना पती बाबाजी जांभळकर, सावत्र मुलगा राहुल, पुतण्या शैलेश आणि त्याचा एक अनोळखी मित्र तिथे आले. राहुलने ट्रॅक्टरने संगिता यांची दीड एकर जमीन नांगरण्यास सुरुवात केली. संगिता यांनी विरोध करत समजावण्याचा प्रयत्न केला असता, चौघांनी त्यांना शिवीगाळ केली. राग अनावर झाल्याने राहुलने लाकडी दांडक्याने तर

■ पान ४ वर

## आर्ट ऑफ लिव्हिंग म्हणजे शांतता, अध्यात्म, मानवता आणि वैश्विक बंधुभावाचे प्रेरणादायी केंद्र – सभापती प्रा.राम शिंदे

### बंगळुरू येथील आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रमात श्री श्री रविशंकर यांचे अभीष्टचिंतन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रम म्हणजे शांतता, अध्यात्म, मानवता आणि वैश्विक बंधुभावाचे प्रेरणादायी केंद्र आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मानसिक शांती, सकारात्मक ऊर्जा आणि अध्यात्मिक समाधानाचा अनुभव मिळतो. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या नेतृत्वाखाली 'द आर्ट ऑफ लिव्हिंग' ही संस्था आज जगभरात मानवी मूल्यांची चळवळ बनली आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.श्री.राम शिंदे यांनी केले. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी पुष्पहार, शाल–श्रीफळ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार केला, त्याप्रसंगी प्रा.शिंदे बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी गुरुदेवांच्या अध्यात्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांच्या मानवतेसाठीच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या नेतृत्वाखाली 'द आर्ट ऑफ लिव्हिंग' ही संस्था आज जगभरात मानवी मूल्यांची चळवळ बनली असून ध्यान, सुदर्शन क्रिया, सेवा, सत्संग आणि अध्यात्मिक ज्ञानाच्या माध्यमातून लाखो लोकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

समाजात वाढत असलेला ताणतणाव, हिंसा आणि विभाजनाच्या पार्श्वभूमीवर गुरुदेवांनी शांतता, संवाद आणि अंतर्मनातील परिवर्तनाचा मार्ग जगाला दाखवला आहे. "वसुधैव कुटुंबकम्" या भारतीय संस्कृतीच्या संदेशाला त्यांनी जागतिक स्तरावर पोहोचवले, असे गौरवोदगारही महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. शिंदे यांनी काढले. यावेळी त्यांनी अहमदनगरचे 'अहिल्यानगर' असे नामकरण करण्यामागे गुरुदेवांनी दिलेल्या सूचनेचाही विशेष उल्लेख केला. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यास अभिवादन करण्यासाठी हे नामांतर ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. मा.शिंदे–मा.फडणवीस महायुती सरकारच्या कार्यकाळात या मागणीची पूर्तता आणि अंमलबजावणी झाल्याचे त्यांनी यावेळी अभिमानाने नमूद केले.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी १२ जानेवारी, २०१० रोजी पुण्यात आयोजित 'अंतर्नाद' या ऐतिहासिक संगीत मैफलीची आठवण करून दिली. 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनाचा जागतिक विक्रम प्रस्थापित करणाऱ्या या कार्यक्रमाचे आपण प्रत्यक्ष साक्षीदार ठरलो असे त्यांनी सांगितले. दिवंगत ज्येष्ठ भाजपा नेते श्री गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या माध्यमातून त्या ऐतिहासिक क्षणांचा अनुभव घेण्याचे भाग्य लाभल्याचेही त्यांनी नमूद केले. देशात आणि जगात शांतता, समृद्धी व सदभावना नांदो, अशी प्रार्थना करत गुरुदेव श्री श्री रविशंकर यांना मानवतेसाठीच्या निस्वार्थ सेवेसाठी आपल्या भाषणात त्यांनी शेवटी मनःपूर्वक धन्यवाद दिले.

## दै. आकर्षण निवडक

### गुणवंत व संस्कारी विद्यार्थी घडवणे हेच जय बजरंग विद्यालयाचे उद्दिष्ट- फिरोदिया



अहिल्यानगर- आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील २०२५- २६ या शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय यश संपादन केलेल्या इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रसिद्ध उद्योजक श्री नरेंद्र फिरोदिया ह्याच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. नरेंद्रजी फिरोदिया सर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. फिरोदिया सर यांच्या हस्ते दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे सहसचिव मा. श्री. उमेशजी गांधीसर,व्यवस्थापक श्री.आशुतोष घाणेकर सर, प्राचार्या सौ.पाठक मॅडम, प्राथमिक चे मुख्याध्यापक श्री. अमोल क्षीरसागर सर यांनी विद्यार्थ्यांचे,शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन करून या यशामागील सर्वांच्या परिश्रमांचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मनीषा टेमकर मॅडम यांनी केले.

### भिंगार वेस येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर

अहिल्यानगर- भिंगार वेस परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे हाल होत असून, या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी भिंगार येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने केली आहे. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी भिंगार वेस चौकात कायमस्वरूपी पोलीस कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी, या मागणीचे निवेदन शहर वाहतूक शाखा तसेच भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनला देण्यात आले.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे भिंगार शहराध्यक्ष शिवम भंडारी, संपत बेरड, अनिल तेजी, सुदाम गांधले, दीपक लीपाने, अजिंक्य भिंगारदिवे, सागर चवंडके, दिनेश लंगोटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. भिंगार वेस हा परिसर हा अहिल्यानगर शहराला जोडणारा अत्यंत वर्दळीचा भाग मानला जातो. येथे सतत वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. मात्र वाहतूक नियंत्रणासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, प्रवासी तसेच दुचाकी व चारचाकी वाहन चालकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भिंगार वेस परिसरातील वाहतूक परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. १२ मे रोजी या ठिकाणी झालेल्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे एका रुग्णवाहिकेलाही अडकून पडावे लागले होते. परिस्थिती इतकी बिकट झाली होती की, रुग्णवाहिकेच्या चालकाला स्वतः वाहनातून खाली उतरून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करावा लागला. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला असून, आपत्कालीन सेवांनाही वाहतूक कोंडीचा फटका बसत असल्याचे स्पष्ट झाले आहे.या वारंवार होणाऱ्या कोंडीमुळे आर्थिक नुकसानासह जीवितहानी होण्याची शक्यताही नाकारता येत नसल्याचे पदाधिकाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. भिंगार परिसराचे योग्य नियोजन करून वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची गरज असून, भिंगारकरांचा वाहतूक कोंडीत अडकलेला ''श्वास'' मोकळा करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. भिंगार वेस चौकात कायमस्वरूपी पोलीस कर्मचारी नियुक्त केल्यास वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे सुलभ होईल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास शिष्टमंडळाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. सदर मागणीचे निवेदन शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अन्सार शेख तसेच भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांना देण्यात आले.

'शब्द फुलांची ओंजळ' काव्यसंग्रहाचे योगेश सोमण यांच्या हस्ते प्रकाशन

# ग्रामीण भागातील जीवनमूल्ये, संस्कार आणि संवेदना जपणारे साहित्य समाजासाठी आवश्यक – योगेश सोमण

**गणराज प्रकाशनच्या वतीने योगेश सोमण यांचा सत्कार; शब्द फुलांची ओंजळतून ग्रामीण संस्कृती, नाती आणि संवेदनांचा हृदयस्पर्शी आविष्कार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ग्रामीण संस्कृती, माणसांमधील जिव्हाळ्याची नाती, आईचे ममत्व, भक्तीभाव आणि ग्रामीण जीवनातील सहज–सोप्या भावविश्वाचा हृदयस्पर्शी आविष्कार घडविणाऱ्या कवी सखाराम गोरे लिखित व गणराज प्रकाशन प्रकाशित 'शब्द फुलांची ओंजळ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचे अध्यक्ष तसेच ख्यातनाम अभिनेते, दिग्दर्शक आणि लेखक योगेश सोमण यांच्या हस्ते झाले.

अहमदनगर जिल्हा वाचनालय येथे आयोजित करण्यात आलेल्या या प्रकाशन सोहळ्यास साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती. साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी व महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल या कार्यक्रमात गणराज प्रकाशनच्या वतीने योगेश सोमण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, जिल्हा वाचनालयाचे कार्यवाह विक्रम राठोड, नगर साहित्य परिषदेच्या शिल्पा रसाळ, कवी सखाराम गोरे, प्रकाशक व मसाप जिल्हा प्रमुख प्रा. गणेश भगत, सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे, लेखक सदानंद भणगे यांच्यासह विविध संस्था, साहित्यिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर आणि रसिक वाचक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. गणेश भगत यांनी गणराज प्रकाशनाच्या साहित्यसेवेचा आढावा घेताना सांगितले की, ग्रामीण भागातील होतकरू कवी आणि साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य गणराज प्रकाशन सातत्याने करत आहे. त्यांच्या साहित्याचे प्रकाशन करून ग्रामीण विचार, संस्कृती आणि माणुसकी समाजापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण साहित्यिक सांस्कृतिक कार्य प्रकाशन संस्था करत आहे. 'शब्द फुलांची ओंजळ' हे गणराज प्रकाशनाचे तब्बल २०७ वे पुस्तक असल्याचे त्यांनी सांगितले.

कवी सखाराम गोरे यांच्या साहित्यिक प्रवासाविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, गोरे हे व्यासंगी साहित्यिक असून हा त्यांचा सातवा काव्यसंग्रह आहे. त्यांच्या कवितांमध्ये जीवनातील सहजभाव, निसर्ग, माणुसकी आणि ग्रामीण जगण्याचे वास्तव अत्यंत प्रभावीपणे उमटले आहे. ग्रामीण मातीतली नाळ त्यांच्या कवितांमधून स्पष्ट जाणवते. त्यांच्या शब्दरचनेत रांगडी बोलीभाषेची गोडी असून ती वाचकांच्या मनाला थेट स्पर्श करते, असेही त्यांनी नमूद केले.

प्रकाशनप्रसंगी बोलताना योगेश सोमण यांनी ग्रामीण साहित्याचे महत्त्व अधोरेखित केले. ग्रामीण भागातील जीवनमूल्ये, संस्कार आणि संवेदना जपणारे साहित्य समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. सखाराम गोरे यांच्या कवितांमध्ये ग्रामीण जीवनातील वास्तव, नात्यांतील ऊब आणि माणुसकीचा स्पर्श जाणवतो. आजच्या धकाधकीच्या युगात अशा साहित्याची समाजाला अधिक गरज असल्याचेही त्यांनी मत व्यक्त केले.

कवी सखाराम गोरे यांच्या कवितांमध्ये ग्रामीण स्त्रीजीवनाचे अत्यंत प्रभावी चित्रण आढळते. तिचे कष्टमय आयुष्य, घरातील जबाबदाऱ्या, भक्तिभाव, तुळशीला पाणी घालणारी संस्कारशील स्त्री आणि कुटुंबाचा केंद्रबिंदू असलेली चैतन्यमय कारभारीण या विविध रूपांचे चित्रण त्यांच्या कवितेतून जिवंत होते. आईच्या ममत्वाचा आणि त्यागाचा भावनिक आविष्कारही त्यांच्या कवितांमधून प्रकर्षाने जाणवतो.

तसेच भक्तीपर कवितांमधून अध्यात्मिक भावविश्व, तर ग्रामीण संस्कृतीवरील कवितांमधून मातीतला सुगंध अनुभवायला मिळतो. त्यांच्या कविता संवेदनशील, भावस्पर्शी आणि वास्तववादी असल्याने रसिक वाचकांकडून त्यांना विशेष प्रतिसाद मिळत आहे. उपस्थित साहित्यप्रेमींनी कवी सखाराम गोरे यांच्या साहित्यिक कार्याचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

## टंचाईऐवजी कार्यकर्त्यांचे डफडे वाजवण्यातच दौरा गेला

**खासदार लंके यांच्या कामांवरून विखेंना नगराध्यक्षा कावरे यांचा टोला**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** पारनेर शहराच्या नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पारनेर दौऱ्यावर जोरदार टीका करत तालुक्यातील पाणीटंचाई, टँकर व्यवस्थापन आणि विकासकामांच्या श्रेयावरून गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. पालकमंत्री साहेब पारनेरमध्ये पाणीटंचाई बैठकीसाठी आले होते की स्वतःचे नावाचे डफडे वाजवणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हट्टासाठी? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

डॉ. कावरे यांनी म्हटले आहे की, पारनेर तालुक्याच्या दौऱ्यात पालकमंत्र्यांकडून काही भरीव घोषणा किंवा ठोस निर्णयांची अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात दौरा केवळ राजकीय शक्तिप्रदर्शनापुरताच मर्यादित राहिल्याचा आरोप त्यांनी केला. पाणीटंचाई बैठकीत प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांच्या अपयशावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना त्यांनी म्हटले की, तालुक्यात दरवर्षी मार्च महिन्यापासून टँकर सुरू होतात, मात्र यंदा मे महिना संपत आला तरी अनेक गावांत टँकर व्यवस्था सुरू झालेली नाही. हे पालकमंत्री म्हणून मोठे अपयश असल्याचे त्यांनी नमूद केले.

टँकर पुरवठ्याचे कंत्राट घेतलेला ठेकेदार गायब झाल्याने संपूर्ण व्यवस्था कोलमडली असून याबाबत प्रशासनाकडून माहिती घेण्यात आली का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. पारनेर तालुक्याची भौगोलिक रचना आणि अल्प पर्जन्यमान लक्षात घेता अनेक गावांना मार्च ते जून या कालावधीत टँकरवर अवलंबून राहावे लागते. वारंवार मागणी करूनही टँकर सुरू झाले नसल्याने नागरिकांमध्ये संताप असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

यावेळी डॉ. कावरे यांनी खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या विकासकामांचाही उल्लेख केला. देवीभोयरे फाटा– पारनेर –सुपा– खडकी मार्ग, न्यायालय इमारत, बस डेपो, पळशी येथील आश्रमशाळा यांसारखी कामे लंके यांनी मंजूर करून आणल्याचा दावा करत पालकमंत्री केवळ इतरांनी मंजूर केलेल्या कामांची पाहणी करण्यासाठीच आले होते का? असा सवाल त्यांनी केला.



## दुसऱ्याच्या कामांचे उद्घाटन कशाला करता?

**खासदार नीलेश लंके यांचा पालकमंत्री विखेंवर जोरदार हल्लाबोल**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**पारनेर–** पारनेर तालुक्यातील विविध विकासकामांच्या उदघाटन व भूमिपूजन कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार टीका करत विकासकामांच्या श्रेयावरून थेट सवाल उपस्थित केला आहे. कान्हुर पठार येथे आयोजित कार्यक्रमात खा. लंके हे बोलत होते. ते पुढे म्हणाले, आपल्या जिल्ह्याचे आदर्श पालकमंत्री पारनेर तालुका दौऱ्यावर आहेत. तुम्ही स्वतःची कामे मंजूर करा आणि मग उदघाटन करा. नीलेश लंके यांनी मंजूर केलेल्या कामांचे उदघाटन कशाला करता? असा थेट सवाल खासदार लंके यांनी उपस्थित केला.

खासदार लंके पुढे म्हणाले की, पळशी येथे सात कोटी रुपयांची आश्रमशाळा मी मंजूर करून बांधली. त्या शाळेचे उदघाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होत आहे. तसेच पारनेरचे बसस्थानक आणि कोर्टाची इमारतही मी मंजूर करून आणली आहे. मात्र त्या कामांची पाहणी पालकमंत्री करत आहेत.

यावेळी त्यांनी अधिक आक्रमक भूमिका घेत, मी दुसऱ्याच्या कामांची पाहणीसुद्धा करत नाही आणि दुसऱ्याने मंजूर केलेल्या कामांवर जातही नाही. मी आमदार झाल्यापासून कोणाच्याही कामाचे खोटं उदघाटन केलेलं नाही. आपल्या झेंड्यावर छाती काढून मी पंढरपूरला जात असतो. दुसऱ्याच्या कामाचे चोरट्या भामट्यावाणी भूमिपूजन मी करत नसतो, असे म्हणत पालकमंत्री विखे पाटील यांना टोला लगावला.

तुम्ही तुमची कामे मंजूर करा आणि नंतर उदघाटन करा. तुमच्या राजकीय कारकिर्दीत काय केलं ते जनतेसमोर ठेवा. फक्त जिरवा–जिरवी केली; मात्र विकासाची ठोस कामे केली नाहीत,अशा शब्दांतही खासदार लंके यांनी टीका केली. राजकीय वातावरण अधिक तापवत खासदार लंके म्हणाले, स्वतःच्या झेंड्यावर पंढरपूर करायला शिका. दुसऱ्याच्या झेंड्यावर पंढरपूर करू नका,असा खोचक टोला त्यांनी लगावला.

याचवेळी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विकासकामांवर चर्चा झाली नाही. ज्याला जे करायचे ते करू द्या. आपला पारनेर तालुका स्वाभिमानी आहे आणि तो तसाच स्वाभिमानी ठेवावा,'' असे आवाहन त्यांनी कार्यकर्ते आणि नागरिकांना केले.

जेष्ट साहित्यिका प्रतिभा खैरनार यांच्या शुभ हस्ते राज्यस्तरीय पुण्यश्लोक

## अहिल्याबाई होळकर साहित्य रत्न पुरस्काराने कथालेखक बाळासाहेब देशमुख सन्मानित



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्व पै किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय वे०६ ग्रामीण मराठी साहित्य संमेलन, नुकतेच संपन्न झाले .साहित्य संमेलनाध्यक्षपदी साहित्यिका, कवयित्री प्रतिभा खैरनार या होत्या. तर साहित्य संमेलन आयोजक नाना डोंगरे हे होते. संमेलनात विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या साहित्य संमेलना.. राज्यस्तरीय पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर साहित्यरत्न पुरस्कार कथालेखक श्री बाळासाहेब देशमुख यांना , संमेलनाध्यक्ष साहित्यिका प्रतिभा खैरनार यांच्या शुभहस्ते देण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, प्रा गणेश भगत, संदीप रासकर गीताराम नरवडे , शब्बीर शेख सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचे वृत्तपत्रात साहित्य लेखन कट्टामध्ये साहित्य सातत्याने प्रकाशित होत असते. यावर्षी दहा दिवाळी अंकांमध्ये त्यांच्या कथा प्रकाशित झालेल्या आहेत. केडगाव तालुका दौंड येथे , ज्येष्ठ साहित्यिक फ.मुं. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या भीमथडी साहित्य संमेलनामध्ये त्यांना कथाकथन सत्र अध्यक्ष पदाचा मान मिळालेला आहे.बाळासाहेब देशमुख यांचे आजवर विविध आकाशवाणी केंद्रावर १२० कथा प्रसारित झालेल्या आहेत. राज्यस्तरीय साहित्य संमेलन मध्ये त्यांचे आजवर २९ कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत..त्यांच्या या निवडीबद्दल ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, बाबुराव उपाध्ये ,दिलीप कापसे, रूपचंद शिदोरे , उदय वैद्य, ज्येष्ठ साहित्य चंद्रशेखर जोशी पुणे, ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ वाडेकर पुणे,यांनी अभिनंदन केले आहे.

## दोन तांड्यांवरील पाणीपुरवठा ठप्प; महिलांची वणवण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील दाभमुळ ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या रेखानाईक तांडा व बालाजीनगर तांडा येथे गेल्या अनेक महिन्यांपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. विहिरीवरील रोहित्र जळाल्यामुळे पाणीपुरवठा योजना बंद पडली असून महिलांना भर उन्हात दूरवरून पाणी आणावे लागत आहे.

पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना शेतशिवारातील विहिरींवर अवलंबून राहावे लागत असून सकाळपासूनच महिलांची पाण्यासाठी पायपीट सुरू असते. अनेकदा शेतमालकांकडून पाणी देण्यास नकार मिळत असल्याने महिलांचे मोठे हाल होत आहेत. वाढत्या तापमानामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.

ग्रामपंचायतीकडून रोहित्र दुरुस्तीबाबत पाठपुरावा सुरू असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात अद्याप पाणीपुरवठा सुरळीत झालेला नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या माहितीत विसंगती असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. काही अधिकाऱ्यांनी रोहित्र दुरुस्तीचे काम सुरू असल्याचे सांगितले, तर काहींनी पाणीपुरवठा बंद नसल्याचा दावा केला. त्यामुळे नागरिक संभ्रमात पडले असून तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी महिलांनी केली आहे.

## हज यात्रेस जाणाऱ्यांचा मढे वडगांव ग्रामस्थांकडून सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीगोंदा तालुक्यातील मढे वडगांव येथे लोकनियुक्त सरपंच प्रमोदजी शिंदे, माजी उपसरपंच राजकुमार उंडे, चेअरमन बापूसाहेब वाबळे, सामाजिक कार्यकर्ते आप्पासाहेब भोसले,यांच्या वतीने पवित्र मक्का शरीफ येथे हज यात्रेस जाणारे हाजी सलीम चेसीवाले,हाजी शरफुद्दीन, जनाब हाजी नासिर (सोनम मेन्स पार्लर), शाह नवाज़ कॉन्ट्रैक्टर (बुरहान नगर), रज़ा शाह नवाज़, यांचा मढेवडगांव ग्रामपंचायत येथे मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने सत्कार करण्यात आले या वेळी कामरान भाई ,जावेद हाजी,ज़मीर हाजी साहब,ज़ाहिर हाजी साहब,इब्राहिम जावेद,यूसुफ सलीम,अदी मान्यवर उपस्थित होते या वेळी सरपंचांनी आपल्या भाषणात सागिंतल्यकी आपण हज ला गेल्यावर आपल्या देशात एकोपा नांदू दे जातीय सलोखा राहू दे असी प्रार्थना अल्लाह कडे करावेत ही आमच्या ग्रामस्थांकडून विनंती आहे तसेच हज यात्रेस जाणाऱ्या परिवारांसा त्यांच्या व ग्रामस्थांकडून शुभेच्छा देण्यात आले.

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जाहीर आवाहन

## २१ मे रोजी प्रा. शाम मानव यांचे छत्रपती संभाजीनगरात व्याख्यान

**'बुवा तेथे बाई' विषयावर भोंदूगिरी, अंधश्रद्धा आणि महिलांच्या शोषणावर सडेतोड भाष्य**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** समाजातील अंधश्रद्धा, जादूटोणा आणि भोंदूगिरीविरोधात सातत्याने जनजागृती करणारे अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक व राष्ट्रीय संघटक प्रा. शाम मानव यांचे जाहीर व्याख्यान येत्या २१ मे रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. 'बुवा तेथे बाई' या प्रबोधनात्मक विषयावर होणाऱ्या या व्याख्यानाला पैठण तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे तालुका संघटक कपिल पहिलवान यांनी केले आहे.
हे व्याख्यान गुरुवार, दि. २१ मे २०२६ रोजी रुख्मिणी हॉल येथे पार पडणार आहे.

सध्याच्या डिजिटल युगातही समाजात अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीचे प्रकार वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनेक भोंदू बाबा, बुवा आणि तांत्रिकांकडून सर्वसामान्यांची, विशेषतः महिलांची आर्थिक, मानसिक व शारीरिक फसवणूक होत असल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर प्रा. शाम मानव हे 'बुवा तेथे बाई' या विषयातून भोंदूगिरीमागील वास्तव, त्यांचे छुपे अजेंडे आणि महिलांचे होणारे शोषण यावर सडेतोड भाष्य करणार आहेत. तसेच, अशा फसवणुकीपासून स्वतःला आणि कुटुंबाला कसे वाचवावे, याबाबत वैज्ञानिक व कायदेशीर मार्गदर्शनही ते करणार आहेत.''सर्वसामान्यांची होणारी आर्थिक, मानसिक आणि शारीरिक फसवणूक रोखण्यासाठी समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजणे गरजेचे आहे. प्रा. शाम मानव यांचे विचार ऐकणे ही काळाची गरज असून, नागरिकांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा,'' असे मत कपिल पहिलवान यांनी व्यक्त केले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगरच्या आदित्य क्षीरसागर यांची थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी




अहिल्यानगर- बारामती येथे दिनांक १६ व १७ मे २०२६ रोजी पार पडलेल्या डॅन ग्रेडेशन परीक्षेमध्ये अहिल्यानगर येथील युवा कराटे प्रशिक्षक सेन्सेई आदित्य क्षीरसागर यांनी उल्लेखनीय यश संपादन करत थर्ड डॅन बेल्ट परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या यशामुळे क्रीडा व कराटे क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आदित्य क्षीरसागर हे अचिव्हर्स स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक व प्रशिक्षक असून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना कराटेचे प्रशिक्षण देत राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडविण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. मेहनत, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी कराटे क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा थर्ड डॅन ब्लॅक बेल्ट हा टप्पा गाठला आहे. ही परीक्षा ट्रॅडिशनल शोतोकान अँड स्पोर्ट्स कराटे ऑर्गनायझेशन (टी.एस.एस.के.ओ इंडिया) चे अध्यक्ष शिहान रवींद्र करळे तसेच टेक्निकल डायरेक्टर शिहान विनय बोढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी बारामती येथील शरयू फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. शर्मिला (वहिनीसाहेब) पवार यांच्या हस्ते आदित्य क्षीरसागर यांना ब्लॅक बेल्ट, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत असून, भविष्यातही त्यांनी कराटे क्षेत्रात आणखी मोठी कामगिरी करावी अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

### चिखली ग्रामपंचायतीतील सार्वजनिक वाचनालय प्रकरण तापले



अहिल्यानगर - मौजे चिखली ता. श्रीगोंदा येथील खासदार निधीतून उभारण्यात आलेल्या सार्वजनिक वाचनालयाची इमारत कोणतीही शासकीय निर्लेखन मंजुरी न घेता पाडण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या प्रकरणी सरपंच, ग्रामसेवक व संबंधित दोषींवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.माजी सैनिक महेश भिवसेन झेंडे यांनी ''आपले सरकार'' पोर्टलवर याबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या स्तरावर त्रिस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली. या चौकशीत सार्वजनिक वाचनालयाची इमारत निर्लेखन प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वीच पाडण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती समोर आली आहे.सदर वाचनालयाची इमारत खासदार फौझिया तहसीन खान यांच्या खासदार निधीतून सन २०१०-२०११ मध्ये बांधण्यात आली होती. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, ९ डिसेंबर २०२४ रोजी मध्यरात्री जेसीबीच्या सहाय्याने चांगल्या स्थितीतील वाचनालय पाडण्यात आले. विशेष म्हणजे, त्यावेळी कोणतीही अधिकृत निर्लेखन मंजुरी घेतलेली नव्हती.त्यानंतर १७ मार्च २०२५ रोजी तक्रार दाखल झाल्यावर संबंधितांनी पाठपुरावा करून १९ मार्च २०२५ रोजी निर्लेखन आदेश मंजूर करून घेतल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तसेच निर्लेखन प्रस्तावात चुकीची माहिती देण्यात आल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे.तक्रार अर्जानुसार, प्रस्तावात वाचनालयाच्या शेजारी शाळा असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात त्या परिसरात शाळा नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच वाचनालय इमारतीचे वय ३० वर्षे दाखविण्यात आले.

# शांतीनगरच्या विकासाला नवी गती

## आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ

### नगरसेवक अविनाश घुले, सुरेश बनसोडे, अनिता शेट्टीया, सुजाता पडोळे यांच्या प्रयत्नांना यश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक १३ मधील सारसनगर–शांतीनगर परिसरातील बहुप्रतिक्षित रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या प्रश्नाला अखेर मार्ग मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. नारळ फोडून या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

या प्रसंगी नगरसेवक सुरेश बनसोडे, अविनाश घुले, विपुल शेट्टीया, राजेंद्र पडोळे, संतोष सूर्यवंशी, शिरील जाधव, विक्टर पवार, जेकब जाधव, सुरेश आरोळे, दीपक साळवे, मनोज साळवे, अंकुश मोहिते, जी. एम. जेम्स, जॉन राजू अगस्ती, नंदकुमार परदेशी, ठाकूर दास परदेशी, फ्रांकलीन कुटिनो, सुषमा प्रभाकर, बार्नबस अगस्ती, नित्यांनंद कांबळे नीरज मकासरे, चंद्रकांत देठे, योगेश शेळके, अमित कनोजिया, प्रशांत पवार, रवी थोरवे, गिरीश परदेशी, अशोक सोनवणे, प्रीतम गायकवाड, किरण आल्हाट, किशोर शिंदे, अविनाश चौधरी, गणेश साबळे, भूषण तांबे, नितीन साबळे, मनीष कनोजिया, ओम तांबे, गणेश कोल्हे आकाश शिंदे, प्रकाश भिंगारदिवे आदींसह नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमात बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, शहरातील प्रत्येक प्रभागात दर्जेदार विकासकामे पोहोचवण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. नागरिकांना चांगले रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका व प्रशासनाच्या माध्यमातून नियोजनबद्ध कामे केली जात आहेत. शांतीनगर परिसरातील नागरिकांनी अनेक वर्षांपासून रस्त्याच्या समस्येबाबत मागणी केली होती. त्या मागणीची दखल घेत चारही नगरसेवकांच्या माध्यमातून या काँक्रिटीकरण कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, भविष्यातही परिसराच्या विकासासाठी कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, केवळ भूमिपूजन करून थांबणे हा आमचा हेतू नसून कामाची गुणवत्ता आणि नागरिकांचे समाधान यालाच आम्ही प्राधान्य देत आहोत. नागरिकांच्या पैशातून होणारी प्रत्येक कामे टिकाऊ आणि दर्जेदार असली पाहिजेत. शांतीनगर परिसरातील रस्ते, पाणी व स्वच्छतेचे प्रश्न टप्प्याटप्प्याने सोडवले जाणार असून नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागू नये यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

आमदार जगताप यांनी शहराचा विकास केवळ मध्यवर्ती भागापुरता मर्यादित न राहता उपनगर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या वस्त्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे सांगत शांतीनगर परिसराचा विकास अधिक गतीने करण्यात येणार असल्याचे नमूद केले. विकासकामांमध्ये पारदर्शकता आणि गुणवत्तेला प्राधान्य देत शहराचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या विशेष प्रयत्नांमुळेच शांतीनगर परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू झाली आहेत. त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लागत आहेत. नागरिकांच्या समस्या सातत्याने आमदारांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या आणि त्यांनी तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत कामांना मंजुरी मिळवून दिली.

ते पुढे म्हणाले की, काँक्रिटीकरण होणारा रस्ता अत्यंत उच्च दर्जाचा व टिकाऊ स्वरूपाचा असणार आहे. या रस्त्यामुळे पावसाळ्यातील चिखल, खड्डे आणि वाहतुकीच्या समस्यांपासून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच परिसरातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले असून, येत्या काळात सॅम्पल पंप व बूस्टर पंप बसवण्यात येणार आहेत. त्यामुळे पाण्याचा दाब वाढून नागरिकांना नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अनेक वर्षांपासून नागरिकांना कमी दाबाने पाणी येणे, अपुरा पुरवठा आणि टंचाईचा सामना करावा लागत होता. मात्र आता या सर्व प्रश्नांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नियोजनबद्ध कामे सुरू करण्यात आली असून, शांतीनगर परिसराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेवक अविनाश घुले यांनी केले, तर आभार प्रदर्शन विपुल शेट्टी यांनी मानले.

## अक्षय कर्डिले यांची आमदारपदी निवड झाल्याबद्दल सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अक्षय कर्डिले यांची आमदारकी पदी निवड झाल्याबद्दल सत्कार भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यंकटेश कुलकर्णी , रोहन भुजबळ , अभिषेक नरसाळे, अजिंक्य गुरावे आदी उपस्थित होते.नुकत्याच राहुरी पोट निवडणुकीत विजयी होऊन अक्षय कर्डिले हे आमदार झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. शिर्डी येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यक्रमास येण्याचे निमंत्रणही देण्यात आले.

सत्कार ला उत्तर देताना अक्षय कर्डिले म्हणाले, दहावी व बारावीचा यशस्वी मुलांचे अभिनंदन जे काही मदत लागेल ती करण्यास मी तयार आहे हीच पिढी भारताचे भविष्य आहे तरुण पिढी शिकली तरच भारत देश पुढे जाईल. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद करत असलेले काम आदर्शवत आहे.

ते पुढे म्हणाले ''राहुरी तालुक्यातील जनतेने माझ्यावर दाखवलेला विश्वास हा माझ्यासाठी खूप मोठा सन्मान आणि जबाबदारी आहे. स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले साहेबांनी आयुष्यभर जनतेची सेवा केली, विकासाची कामे केली आणि सर्वसामान्य माणसाशी नाळ जोडून ठेवली. त्यांचा आशीर्वाद आणि जनतेचे प्रेम यामुळेच मला हा विजय मिळाला आहे. हा विजय माझा नसून राहुरी तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्याचा, ज्येष्ठांचा, माताभगिनींचा आणि युवकांचा आहे. निवडणुकीत सर्वांनी अहोरात्र मेहनत घेतली, त्याबद्दल मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. पुढील काळात राहुरीच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करणार असून शिक्षण, पाणी, शेती, रस्ते आणि रोजगार या प्रश्नांना प्राधान्य देणार आहे.

स्व. शिवाजीराव कर्डिले साहेबांनी जपलेली विकासाची परंपरा पुढे नेण्याचा मी पूर्ण प्रयत्न करेन. जनतेच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही आणि सर्वसामान्यांच्या सेवेसाठी सदैव उपलब्ध राहीन. ''

## महाजन गल्ली येथील गीता मंदिरामध्ये श्रीविष्णू पूजा हवन धार्मिकतेत संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सनातन धर्मसभेच्यावतीने अधिक मासानिमित्ताने आज सोमवारी (१८ मे) महाजन गल्ली येथील गीता मंदिरामध्ये श्रीविष्णू पूजा हवन भिंगार येथील श्री. नानासाहेब देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले.

सर्वश्री बंडोपंत धर्माधिकारी, चकोर मुळे, निलेश धर्माधिकारी, उमेश वाळूंजकर आदींनी वेदमंत्राच्या घोषात या कार्यक्रमाचा शुभारंभ केला. यावेळी सनातन धर्मसभेचे सभासद, विश्वस्त आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नेत्रदूत जालिंदर बोरुडे पुणे येथे राष्ट्रीय गौरव पुरस्काराने सन्मानित

**नेत्र तपासणी शिबिर, नेत्रदान, अवयवदान जनजागृतीत योगदानाची दखल । बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी – सिंघानिया**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना पुणे येथील आनंदी युनिव्हर्सल फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रीय गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बालगंधर्व सभागृह येथे झालेल्या सन्मान सोहळ्यात पुणे रोटरी क्लबचे अध्यक्ष अशोक सिंघानिया व अभिनेत्री नेहा घोणसे यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश विटकर, सचिव तेजस्विनी दिवटे, उद्योजक कांतीलाल कटारिया आदी उपस्थित होते.

अशोक सिंघानिया म्हणाले की, ''जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने नेत्रसेवा करत हजारो लोकांना नवजीवन दिले आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने गरजूंना नवसंजीवनी ठरत आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी अशा प्रकारे काम करणारे व्यक्तिमत्व अत्यंत दुर्मिळ असल्याचे त्यांनी सांगितले.

अभिनेत्री नेहा घोणसे यांनी जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अधिकाधिक युवकांनी सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले.

जालिंदर बोरुडे यांनी फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या तब्बल ३४ वर्षांपासून सातत्याने नेत्रसेवा कार्य सुरू ठेवले आहे. त्यांनी स्वखर्चाने विविध शिबिरे आयोजित करून हजारो गरजू आणि नेत्रदोष असलेल्या रुग्णांची मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करून त्यांना नवदृष्टी दिली आहे. याशिवाय त्यांनी नागरिकांमध्ये मरणोत्तर नेत्रदानाची जागृती करून अनेकांकडून नेत्रदान घडवून आणले आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून अवयवदान जनजागृतीसह विविध सामाजिक उपक्रमही सातत्याने राबविले जात आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान प्रदान करण्यात आला असून, सर्वत्र त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## बार्टी संस्थेच्या वतीने लोकप्रतिनिधींना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळे भेट देण्याचा उपक्रम

### पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना जवळा येथे पूर्णाकृती पुतळा भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व्हावा तसेच समाजामध्ये संविधान आणि सामाजिक समतेची जाणीव अधिक दृढ व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्रातील विविध लोकप्रतिनिधींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळे भेट देण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री मा. ना. राधाकृष्णजी विखे पाटील यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा भेट देण्यात आला.




पारनेर तालुक्यातील जवळा येथे आयोजित विविध विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्यादरम्यान हा कार्यक्रम पार पडला. बार्टी संस्थेचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद तसेच कॉन्ट्रॅक्टर आमिर शेख यांच्या वतीने पालकमंत्री विखे पाटील यांना हा पुतळा सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

यावेळी बार्टी संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि प्रशिक्षणपर उपक्रमांची माहितीही मान्यवरांना देण्यात आली. यावेळी पारनेर तालुक्याचे आमदार काशिनाथ दाते, भाजप राज्य परिषद सदस्य विश्वनाथ दादा कोरडे, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, विनायकजी देशमुख यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत समाजामध्ये समता, बंधुता आणि संविधानिक मूल्ये रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

## उपवर्गीकरण, जनगणना आणि समाज एकजुटीसाठी मातंग समाज सज्ज

### अहिल्यानगरात लवकरच मातंग समाज मेळावा; 'जीवन प्रवास' पुस्तकाचेही होणार प्रकाशन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठान यांच्या वतीने अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहात सकल मातंग समाजाची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक उत्साहात पार पडली. महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या अ.ब.क.ड. उपवर्गीकरणाच्या पार्श्वभूमीवर मातंग समाजाच्या विविध प्रश्नांवर या बैठकीत सखोल चर्चा व विश्लेषण करण्यात आले. तसेच समाजाच्या मागण्यांसंदर्भात राज्य सरकार व मुख्यमंत्री कार्यालयातील सचिव मा. राजेशजी अग्रवाल, मुंबई यांना निवेदन देण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

बैठकीचे आयोजन सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नामदेवराव चांदणे यांनी केले होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भालेराव सर यांनी भूषविले.

यावेळी बोलताना नामदेवराव चांदणे म्हणाले की, ''मातंग समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी समाज एकत्र येणे काळाची गरज आहे. शासनाने उपवर्गीकरणाचा प्रश्न तातडीने निकाली काढावा, यासाठी समाजाने संघटितपणे आवाज उठविणे आवश्यक आहे. अहिल्यानगर शहरात लवकरच भव्य मातंग समाज मेळावा आयोजित करण्यात येणार असून या मेळाव्यास समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. या मेळाव्यात 'जीवन प्रवास' या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे.''

कार्यक्रमाचे अध्यक्ष भालेराव सर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''मातंग समाजाच्या अ.ब.क.ड. उपवर्गीकरणासाठी शासनाकडे अनेक वेळा निवेदने देण्यात आली आहेत, मात्र अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. १५ मे २०२६ पासून जनगणना सुरू झाली असून समाजातील प्रत्येक व्यक्तीने माहिती देताना 'हिंदू-मांग (मातंग)' असा स्पष्ट उल्लेख करावा. समाजाच्या अस्तित्वासाठी व हक्कांसाठी ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. आगामी मेळावा समाजाच्या एकजुटीचा नवा अध्याय ठरेल.''

बैठकीस काशिनाथ सुलाखे पाटील, लक्ष्मण साबळे, शरद मोहिते, दत्तात्रय तुजारे, विष्णू मोहिते, प्रकाश पुजारे, लक्ष्मीकांत भालेराव, बाबासाहेब शिंदे, अशोक भोसले, पी. बी. पाथरे, दिवसेन घोरपडे, रंजीत वैरागर, अरुण ताकवाले, आकाश जगधने, प्रवीण अवचिते, बीडी शेलार, वसंतराव सकट, हिराबाई गोरखे, दत्तू गोरखे, किरण आढागळे, संजय वैरागर, ज्ञानेश्वर साठे, निलेश सरोदे, अभिजीत पवार, धीरज पवार, निलेश पवार आदींसह समाजबांधव व प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याला मुख्यमंत्र्यांकडून निधी मंजूर!

## पालखी मार्गावर वारकऱ्यांसाठी विविध सोयी उपलब्ध होणार; संस्थानच्या पाठपुराव्याला मोठे यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**नेवासा–** श्रीक्षेत्र नेवासे येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या विश्वस्त मंडळाने आगामी आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर केलेल्या मागणीला अखेर मोठे यश आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पालखी सोहळ्याला आता अधिकृत शासकीय सुविधा आणि निधी मंजूर केला आहे. या संदर्भातील मंजुरीचे अधिकृत पत्र जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, संस्थानचे महंत आणि विश्वस्त मंडळाकडे सुपूर्द केले.

पालखी मार्गावरील सुविधा, सुरक्षा आणि स्वच्छतेबाबत संस्थानच्या वतीने दोन महिन्यांपूर्वी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यात आली होती. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी याची तातडीने दखल घेत सकारात्मक निर्णय घेतला. या प्रक्रियेत विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडेही पाठपुरावा करण्यात आला होता. आमदार मोनिका राजळे व आमदार विठ्ठलराव लंघे यांनी विधानभवनात आणि थेट मुख्यमंत्र्यांकडे सातत्याने आवाज उठवला, तर माजी मंत्री शंकरराव गडाख यांचेही यासाठी मोलाचे मार्गदर्शन लाभले.

वारकऱ्यांसाठी या शासकीय सुविधा मिळणार: स्वच्छता व पिण्याचे पाणी: पालखी मार्गावर आणि मुक्कामाच्या ठिकाणी टँकरद्वारे पिण्याचे पाणी तसेच स्वच्छतेसाठी ७ लाख रुपयांचा निधी मंजूर. पालखी तळ आणि विसाव्याच्या ठिकाणी १०० फिरत्या शौचालयांची व्यवस्था केली जाणार.

आरोग्य सुविधा: ठिकठिकाणी वैद्यकीय तपासणी केंद्रे, रुग्णवाहिका आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यासाठी ५ लाख रुपयांचा निधी* मंजूर.पायाभूत सुविधा:* पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्ती, विद्युत व्यवस्था आणि मुक्कामाच्या ठिकाणी तात्पुरत्या दिव्यांची प्रकाश व्यवस्था केली जाणार.सुरक्षा व वाहतूक नियंत्रण: संपूर्ण सोहळा सुरळीत पार पडण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त आणि वाहतुकीचे चोख नियोजन करण्यात येणार आहे.या सर्व सुविधांमुळे यंदा वारकरी बांधवांचा पंढरपूरचा पायी प्रवास अधिक सुखकर, सुलभ आणि सुरक्षित होणार आहे.

प्रतिक्रिया– ''वारकऱ्यांसाठी आरोग्य सेवा, निवारा, पाणी आणि रस्ते सुधारणा यांसारख्या आवश्यक सुविधा तातडीने पूर्ण करण्याबाबत वेळोवेळी मागणी करण्यात आली होती. आज खऱ्या अर्थाने त्या सुविधांसाठी निधी मंजूर झाल्याने माऊलींचा पालखी सोहळा सुलभ व सुरक्षित होईल.'' कैलास जाधव (विश्वस्त)

''ज्ञानेश्वरांनी ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली, त्या खांबाला चैतन्यरूप प्राप्त झाले आहे. अशा पावन पुण्यभूमीतून निघणाऱ्या पालखी सोहळ्यासाठी मुख्यमंत्री महोदयांनी प्रथमच भरीव निधी उपलब्ध करून दिला. त्याबद्दल संपूर्ण वारकरी संप्रदायातून आनंद व्यक्त होत आहे.'' संदीप खरड, माऊली भक्त (शेवगाव)

यांनी केला यशस्वी पाठपुरावा:

संस्थानचे महंत देविदास महाराज म्हस्के, गाथामूर्ती ह.प.प. रामभाऊ महाराज राऊत, ह.प.प. रामनाथ महाराज झिंजुर्के, भगवान महाराज जंगले शास्त्री, संस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग व सर्व विश्वस्त मंडळ, जनसंपर्क अधिकारी आशिष कावरे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष संदीप खराड यांच्यासह नेवासे व शेवगाव मतदारसंघाच्या दोन्ही आमदारांनी या कामासाठी विशेष परिश्रम घेतले.*फोटो ओळी:* अहिल्यानगर येथे अधिकृत सुख–सुविधा व निधी मंजुरीचे पत्र देताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया समवेत संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष आणि विश्वस्त मंडळ.

# तहकुब झालेल्या सर्वसाधारण सभेतील बोल्हेगांव ते सावेडी ते कल्याण रोडच्या भुमापन विषयासंदर्भात शिवसेनेच्या वतीने मनपा आयुक्त यांना निवेदन

## विरोधात कोर्टात जाण्याचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** १५ रोजी तहकुब झालेल्या सर्वसाधारण सभेतील कर्ज घेणे व बोल्हेगांव ते सावेडी ते कल्याण रोडच्या भुमापन विषया संदर्भात शिवसेनेच्या वतीने मनपा आयुक्त यांना निवेदन या विरोधात कोर्टात जाण्याचा इशारा शिवसेनेच्या पदाधिकारी नगरसेवक यांनी दिला आहे .मनपा आयुक्त यांची भेट घेऊन सभा तहकूब झाल्याचा निषेध व्यक्त केला यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे ,शहर प्रमुख संभाजी कदम ,गटनेते दत्तात्रय कावरे ,नगरसेवक बाळासाहेब बोराटे , विक्रम राठोड ,ऍड स्वाती जाधव,नवनाथ कातोरे ,काका शेळके ,परेश लोखंडे ,प्रशांत गडाख ,सलोनी शिंदे,तृप्ती साळवे,संग्राम कोतकर,प्रशांत गायकवाड, चेतन शिरसुल ,आदी उपस्थित होते

म.न.पा. च्या वतीने नेहरु मार्केट, गंजबाजार, व्हेजीटेबल मार्केट, विकसीत करणे, सावेडी येथे व्यापारी संकुल उभारणे बाबत व सर्जेपुरा येथील रंगभवन विकसित करणे हे सर्व विषय बी.ओ. टी. तत्वावर विकसीत करावी व अहिल्यानगर म.न.पा.ची सद्य परिस्थिती पाहता सावेडी भुयार गटार योजनेसाठी १०० टक्के अनुदान केंद्र व राज्य सरकार महायुतीचे असल्याने मिळवण्यास कोणतीही हरकत नाही. यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. वेगवेगळ्या माध्यमातून अंदाजे ७५० ते ८०० कोटी म.न.पा. ला देणे आहे. अशात नविन कर्ज काढुन दिवाळी साजरी करु नका. तरी चुकीच्या व गरज नसलेल्या विषयांमध्ये कर्जाचा बोजा जनतेवर लावु नये. यामध्ये चुकीचे काम झाल्यास प्रसंगी कोर्टात दाद मागितली जाईल.

तसेच बोल्हेगांव ते सावेडी ते कल्याण रोड सीना नदी लगत ३०.०० मीटर रुंदीच्या रस्त्याचे भुसंपादनाचा विषय महासभेसाठी ठेवला होता. या भुसंपादनासाठी शिवसेनेचा विरोध आहे. अ.नगर म.न.पा. हद्दीतील क्षेत्रासाठी उपसंचालक नगर रचना विभाग, त्यांचे मार्गदर्शनाखाली विकास आराखडा नव्याने तयार करण्याचे काम सुरु आहे. हा रस्ता ३० मीटर डी.पी. रस्ता दाखवु शकतो. डी.पी. रस्ता दर्शविल्यास यासाठी नुकसान भरपाई रोख रकमेत देणेची गरज नाही. संबंधित मानांकन आपण टी. डी. आर. च्या स्वरुपातही भरपाई देऊ शकतो. सदर रस्ता सीना नदीच्या लगत असल्याने तसाही पुरनियंत्रण रेषेतील निळ्या रेषेच्या आतून जाणारा आहे. म्हणजे भविष्यात त्या ठिकाणी संबंधीत मालकांना इमारती बांधणेसाठी परवानगी मिळणार नाही. सदर रस्त्याच्या भुसंपादनासाठी लागणा–या रकमेतून आपण त्या ठिकाणी नवीन रस्ता तयार करु शकतो. वरील सर्व गोष्टी पाहता ह्या विषयास आमची मंजुरी नाही.



**अहिल्यानगर दि.१६ मे रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिना चे आयोजन करण्यात आले होते पोलीस अधीक्षक आणि अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या तक्रार निवारणाच्या दिनानिमित्त १०२ नागरिकांनी प्रत्यक्ष येऊन तक्रारी मांडल्यातक्रारीचे समाधान व्यक्त करतांना, डीवायएसपी दिलीप टिपरसे आणि पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्वी व तक्रारदार दिसत आहे. (छायाचित्र–जाकीर शेख)**

# सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आरोपी नामे शेखर रावसाहेब ससे वय २१ वर्षे, रा. बाउजाबाई जेडर ता. जि. अहमदनगर संतोष एकनाथ वारूळे वय ३४ वर्षे, रा. वारूळवाडी, भिंगार, ता.जि. अहमदनगर याने सरकारी कामात अडथळा व धकका बुक्की करून जीवेमारण्याची धमकी दिली. त्याप्रकरणी मा. तदर्थ जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश, क्र. ४ श्रीमती ऋतुजा भोसले मॅडम यांनी आरोपीस भा.द.वि. कलम ३५३ नुसार तीन महिन्यांची शिक्षा व रु. २०००/– दंड, न भरल्यास १५ दिवस साधी कैद, १८६ नुसार एक महिन्यांची शिक्षा व रु. ५००/– दंड, न भरल्यास १० दिवस साधी कैद, १८९ नुसार चार महिन्यांची शिक्षा व रु. १०००/– दंड, न भरल्यास १५ दिवस साधी कैद, व ३४ नुसार दोषी धरून शिक्षा ठोठावण्यात आली. या प्रकरणी सरकारी वकील म्हणून अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश दिवाणे यांनी काम पाहिले. सदर घटनेची थोडक्यात हकिकत अशी की,दिनांक १८/११/२०२१ वेळ ४ वाजून ३० मिनिटे दुपारी आरोपींनी संगमत करून फिर्यादी मंडळ अधिकारी चास व त्यांसोबत असणारे साक्षीदार हे अवैध गौण खनिज उतखनन व वाहतुक करणा–या वाहनांवर कारवाई करणारे भरारी पथक म्हणून शासकीय काम करत असताना एक पांढ–या रंगाचे सहा टायरचा विनानंबरचा टंपर मुरूम माती वाहतुक करताना मिळून आल्याने फिर्यादी व साक्षीदार यांनी ठंपर चालकास थांबवून त्यास वाहतूक शासकीय पास बाबत विचारपूस केली असता ठंपर चालकाने कोणताही पास न दाखवला उडवाउडवीची उत्तरे दिली त्यावेळी एका लाल रंगाचे युनिकॉर्न मोटार सायकल नं. एम. एच. १६ सीआर ५९८५ वर आरोपी संतोष एकनाथ वारूळे हा आला व त्याने फिर्यादी व साक्षीदार यांना अरेरावीची भाषा वापरून धक्काबुक्की केली तुम्हाला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवून फिर्यादी व साक्षीदार हे करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच आरोपी संतोष वारूळे याने आरोपी शेखर ससे यास त्याच्या ताब्यातील डंपर पळून घेवून जाण्यास सांगितले त्याप्रमाणे आरोपी शेखर ससे हा मुरुमाने भरलेला डंपर पळून घेवून जात त्याची युनिकॉर्न मोटारसायकल व मोबाईल घटनास्थळी सोडून पळून गेला. म्हणून आरोपीविरुध्द भा.द.वि. कलम ३५३,१८६,१८९, व ३४ तोफखाना पोलिस स्टेशनला गुन्हयाची नोंद करण्यसात आली. सदर सत्र खटल्यामध्ये सरकार पक्षाच्या वतीने रूपाली दादासाहेब टेमक मंडळ अधिकारी, प्रदीप महादेव आव्हाड महसुल सहायक, राहुल बाबुराव कोळेकर व सपोनि जे. सी. मुजावर चार साक्षीदारांच्या जबानी नोंदविण्यात आल्या. रूपाली सरकार पक्षाच्या भरभक्कम युक्तीवादामुळे मा. न्यायालयाने सरकारी पक्षाचा पुरावा व युक्तीवाद ग्राहय धरून वरीलप्रमाणे शिक्षा ठोठावली.

# थॅलेसेमिया शिबीर अहिल्यानगरमध्ये संपन्न

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथे जागतिक थैलेसेमिया दिनाचे औचित्य साधून १२ मे २०२६ रोजी अहमदनगर आयुष रूग्णालय, तारकपूर रोड अहिल्यानगर येथे त्रातुजा फाऊंडेशन, अहिल्यानगर, जिल्हा रूग्णालय अहिल्यानगर, सक्षम संस्था अहिल्यानगर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अहमदनगर, शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन, अहिल्यानगर आयोजित थलेसेमिया रूग्णांसाठी आणि जनजागृती साठी विविध तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये थॅलेसेमिया रूग्णांची वार्षिक तपासणी, एच.एल. ए. टायपिंग नोंदणी, बोनमॅरो रजिस्ट्रेशन, रक्तदान, अवयव दान, थॅलेसेमिया मायनरची इलेक्ट्रोफोरोमिस तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

प्रास्ताविकात ऋतुजा फाऊंडेशनच्या सचिव तसेच सक्षमच्या प्राणदा प्रकोष्ठ प्रमुख अहिल्यानगर अॅड डॉ. अंजली केवळ यांनी विविध शिबीरांची माहिती दिली. तसेच दोन थॅलेसेमिया मायनर व्यक्तिंचे जर लग्न झाले तरच थैलेसमिया मेजर बाळ जन्माला येण्याची शक्यता प्रत्येक गर्भधारणेत २५ टक्के असते हे प्रमाण पंजाब, गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये जास्त आहे. प्रत्येकाने लग्नाअगोदर थैलेसिमियाची तपासणी करणे आवश्यक आहे. अवयवदानाचे महत्त्व लाकांना पटवून देण्याची गरज आहे. ''जिथे जिथे रक्तदान तिथे तिथे नेत्रदान'' असे अवयवदानाचे महत्त्वच सांगितले. योगेश पैठणकर (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर) यांनी थैलेसेमियाला धैर्याने तोंड देणा–या मुलांचे आणि पालकांचे कौतुक वाटते आणि थैलेसेमिया योद्धयांसाठी असलेल्या दिव्यांगांच्या कायदयाविषयी माहिती दिली. आणि थैलेसेमिया योद्धयांचे कौतुक केले.



डॉ.सुचेता यादव (अति. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय अहिल्यानगर) यांनी थैलेसेमिया रूग्णांमध्ये सतत रक्त घेऊन येणा–या अडचणींना कसे तोंड द्यावे हे सांगून उपस्थित रूग्ण आणि पालकांना थैलेसेमिया रूग्णांच्या सुकर आयुष्याचा मंत्र दिला. ऋतुजा फाऊंडेशनचे काम खूप चांगले चालू आहे. असेच काम पुढे चालू राहावे यासाठी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. श्रीधर वापट (पश्चिम महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्ष,सक्षम संस्था, अहिल्यानगर) यांनी सक्षम संस्था दिव्यांगांसाठी कसे काम करते ते सांगितले. दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी विविध उपक्रमाची माहिती दिली. डॉ राजीव चिटगोपीकर (अध्यक्ष, सक्षम संस्था, अहिल्यानगर) यांनी अशा शिबिराचे आयोजन ऋतुजा फाऊंडेशन करते त्यांचे कौतुक वाटते आणि दिव्यांग मित्र बनून दिव्यांगांसाठी मदतीचे आवाहन केले. समीर निकम (अध्यक्ष, थैलेसेमिया सोसायटी महाराष्ट्र, पुणे) यांनी दुर्गम भागातील थैलेसेमीया योद्धयांचे होणारे हाल विषद केले. शासनाने नोवल थेरेपीसाठी लागणा–या औषधांचा पुरवठा जर केला तर व–याच रूग्णांना रक्ताची गरज भासणार नाही आणि ते औषधांवरच बरे होऊ शकतील असे सांगितले. तसेच अहिल्यानगरमधील ऋतुजा फाऊंडेशनचे काम खूप चांगले चालू आहे. ऋतुजा ही मुलगी ज्या आजारातून बरी झाली त्या रूग्णांसाठी ऋतुजा फाऊंडेशनचे काम कौतुकास्पद असून आमचा आणि आमच्या संस्थेचा त्यांना कायम पाठिंबा असेल असे वक्तव्य त्यांनी केले. तसेच डॉ. सोनाली बांगर (पमुख, आयुष रूग्णालय, अहिल्यानगर) थैलेसेमिया कसा टाळता येऊ शकतो ते सांगितले तसेच रूग्ण आणि पालकांशी संवाद साधला शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन, अहिल्यानगरचे विश्वस्त नरेंदजी फिरोदिया सांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या हिमॅटोलॉजी डे केअर सेंटर, जिल्हा रूग्णालयाच्या वैद्यकिय अधिकारी डॉ.रूपाली कुलकर्णी यांनी जिल्हा रूग्णालयात उपलब्ध असलेल्या सुविधा सांगितल्या आणि रक्तदानाचे तसेच एच. एल. ए. टायपिंगचे महत्त्व लोकांना सांगितले. सक्षमच्या उपाध्यक्षा सौ. संध्या कुलकर्णी यांनी सक्षमने करत असलेल्या कामाचा आढावा सांगितला आणि सक्षम दिव्यांगांसाठी करत असलेल्या कामाचे महत्त्व सांगितले. श्रीमती भारती कुलकर्णी यांनी सक्षमन्ने संघटन मंत्र आणि सक्षमचे गीत म्हटले कार्यक्रमाची सांगता समापन मंत्राने झाली.

शिबीराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा रूग्णालय अहिल्यानगर, सक्षम संस्था अहिल्यानगर, शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरिअल फाऊंडेशन अहमदनगर, थैलेसेमीया सोसायटी महाराष्ट्र, पुणे, हिमॅटॉलॉजि डे केअर सेंटर, जिल्हा रुग्णालय आणि कर्मचारी,सुर्यकांत केवळ,महेश राहिंज, महेश केवळ, सक्षम साळुंके,अशोक तोडमल तसेच अहमदनगर नर्सिंग कॉलेजचे सर्व विद्यार्थी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# ''रंगाच्या डब्यातून उभी केली यशाची इमारत; कान्हूर पठारचा सुपुत्र श्री. संजय रभाजी शेळके आज अंबरनाथमध्ये नामांकित बिल्डर!''



अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील दुष्काळी ओळख असलेल्या कान्हूर पठार गावातून अनेकांनी संघर्षाचा मार्ग निवडला, मात्र त्या संघर्षाला जिद्दीची जोड देत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये श्री. संजय रभाजी शेळके यांचे नाव आज अभिमानाने घेतले जाते.

अत्यंत खडतर परिस्थितीतून जीवनाची सुरुवात करत त्यांनी लहानपणापासूनच संघर्षाचे चटके सहन केले. वडिलांचे छत्र लहान वयात हरपले आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येऊन पडली. एक भाऊ, आई आणि चार बहिणींचा संसार सांभाळताना त्यांनी बालपण अनुभवण्याऐवजी कामालाच आपले आयुष्य मानले.

मुंबईजवळील अंबरनाथ शहरात स्थायिक होत त्यांनी हातात रंगाचा डबा घेत घरांना रंगरंगोटी करण्याचे काम सुरू केले. ''कष्टाची लाज नाही आणि मेहनतीची भीती नाही,'' या जिद्दीवर त्यांनी दिवस–रात्र मेहनत घेतली. पाचवीपासूनच कामाचा प्रवास सुरू झालेल्या श्री. संजय रभाजी शेळके यांनी अनेक कठीण प्रसंगांचा सामना करत स्वतःला घडवले.

रंगकाम करणारा हा युवक पुढे बांधकाम क्षेत्रात उतरला आणि आपल्या मेहनतीच्या जोरावर अंबरनाथ शहरात नामांकित बिल्डर व्यावसायिक म्हणून ओळख निर्माण केली. आज त्यांच्या नावाचा व्यवसायात मोठा दबदबा असून अनेकांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.

यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही त्यांनी आपल्या मातृभूमीशी असलेली नाळ तुटू दिली नाही. ''गावाचे नाव मोठे व्हावे'' या भावनेतून त्यांनी पारनेर रोडवरील कान्हूर पठार येथे सुंदर निवासस्थान उभारले. दुष्काळ, पाण्याची टंचाई आणि संघर्ष अनुभवलेल्या गावाशी त्यांनी कायम आपलेपण जपले आहे.

श्री. संजय रभाजी शेळके यांना गरिबांना मदत करण्याची विशेष आवड आहे. अनेक गरजू कुटुंबांना ते शांतपणे मदतीचा हात देत असतात. संघर्षातून उभा राहिलेला माणूसच दुसऱ्यांच्या वेदना समजू शकतो, याची प्रचिती त्यांच्या कार्यातून वारंवार दिसून येते.

विशेष म्हणजे, शेळके परिवार संपूर्णपणे माळकरी संप्रदायाशी जोडलेला असून घरात धार्मिक आणि संस्कारमय वातावरण आहे. विठ्ठलभक्ती, साधेपणा, संत परंपरेवरील श्रद्धा आणि समाजसेवेची भावना हे संस्कार या कुटुंबाच्या जीवनशैलीत स्पष्टपणे दिसून येतात. त्यामुळेच यश मिळाल्यानंतरही श्री. संजय रभाजी शेळके यांनी नम्रता आणि माणुसकी कायम जपली आहे.

दरम्यान, गभा इंदुबाई रभाजी शेळके यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त कान्हूर पठार येथे भव्य धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या आईचा वाढदिवस श्री. संजय रभाजी शेळके यांनी अत्यंत थाटामाटात आणि भक्तिमय वातावरणात साजरा केला.

यानिमित्त ''सहस्र चंद्र दर्शन सोहळा'' तसेच ''आईची ग्रंथ तुळा समारंभ'' आयोजित करण्यात आला होता.

या धार्मिक कार्यक्रमासाठी नामवंत कीर्तनकारांना निमंत्रित करण्यात आले होते. कीर्तन, भजन आणि धार्मिक वातावरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. हजारो भाविक, ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावत शेळके परिवारावर शुभेच्छांचा वर्षाव केला. ''आईचे आशीर्वाद आणि संस्कार यामुळेच आयुष्यात यश मिळाले,'' अशी भावना श्री. संजय रभाजी शेळके यांनी यावेळी व्यक्त केली.

काही महिन्यांपूर्वी त्यांच्या आयुष्यात अत्यंत धक्कादायक प्रसंग घडला होता. श्री. संजय रभाजी शेळके यांच्या मुलाचे काही गुंडांनी अपहरण करून तब्बल ४० कोटी रुपयांची खंडणी मागितल्याची घटना घडली होती. हा प्रसंग त्यांच्या कुटुंबासाठी अत्यंत वेदनादायक आणि तणावपूर्ण ठरला. मात्र धैर्य, संयम आणि योग्य प्रयत्नांच्या जोरावर त्यांनी आपल्या मुलाची सुखरूप सुटका केली. त्या कठीण प्रसंगातूनही त्यांनी खंबीरपणे उभे राहत संकटावर मात केली.

आज अंबरनाथमध्ये मोठे व्यावसायिक म्हणून ओळख निर्माण केलेल्या श्री. संजय रभाजी शेळके यांच्या यशामागे अथक परिश्रम, कुटुंबासाठी केलेला त्याग, आईविषयीची अपार श्रद्धा, माळकरी संप्रदायातून मिळालेले संस्कार आणि गावाबद्दलची जिव्हाळ्याची भावना आहे. कान्हूर पठारच्या मातीतून उगवलेला हा संघर्षयोद्धा अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी उदाहरण बनला आहे.

**लेखक : पत्रकार संतोष कोरडे**

(पान १ वरून)

## महावितरणाच्या अधिकाऱ्यांना काळे फासण्याचा राष्ट्रवादीचा इशारा

ते पुढे म्हणाले की, ''पावसाळ्यापूर्वी महावितरण विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. नागरिकांच्या तक्रारी तत्काळ सोडवण्यासाठी स्वतंत्र टोल फ्री नंबर जाहीर करावा. नागरिकांना योग्य सेवा देणे ही विभागाची जबाबदारी आहे. मात्र त्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. येत्या आठ दिवसांत परिस्थितीत सुधारणा झाली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कोणतीही पूर्वसूचना न देता तीव्र आंदोलन करेल आणि संबंधित अधिकाऱ्यांना काळे फासण्यात येईल.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, ''अहिल्यानगर शहर व उपनगरामध्ये वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांना मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये दिवसा तसेच रात्री होणाऱ्या वीजखंडितीमुळे उष्माघाताचा धोका वाढला आहे. ही गैरसोय महावितरण विभागाकडून जाणीवपूर्वक केली जात असल्याचे दिसून येते. नागरिकांनी बिल भरले नाही तर तत्काळ वीजपुरवठा खंडित केला जातो, मात्र खंडित झालेली लाईट सुरू करण्यासाठी विभागाकडे वेळ नसतो.

''महावितरण विभागाने तातडीने सुधारणा केली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आपल्या दालनात कोणतीही पूर्वसूचना न देता तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना काळे फासण्यात येईल. त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीस पूर्णपणे महावितरण विभाग जबाबदार राहील,'' असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## पीडितेवर अत्याचार, भोंदूबाबास दहा वर्षे सक्तमजुरी

दूर करण्यासाठी व समस्या निवारणासाठी त्याच्याकडे गेल्यावर तुमच्यावर लोकांनी करणी केली आहे. तुमच्या घरासमोर चेडेगोटे ठेवलेले आहे. त्यासाठी विधी करावा लागेल, असे सांगून जादूटोणा करण्यास सांगितले. पीडिता सतत आजारी पडत असल्याने तिला बरे करण्यासाठी एक विधी करावा लागेल,असे सांगून या भोंदूबाबाने पीडिता व भोंदूबाबाचे एकमेकांच्या गळ्यात हार व मंगळसूत्र घातलेले फोटे लागतील व त्यासाठी लग्नासारखा विधी करून फोटो काढले. पैशाचा पाऊस पाडण्याची कला येते असे सांगून, त्यासाठी पीडितेच्या वडिलांकडून पाच लाख रुपये उकळले. नोव्हेबर २०२० मध्ये आरोपी हा पीडितेच्या घरी आला व तिचा विनयभंग केला. तसेच डिसेंबर २०२० मध्ये आरोपीने तिला दमदाटी करून एअरगनचा धाक दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला व विधीसाठी काढलेल्या फोटोंचा गैरवापर करून तिला ब्लॅकमेल करून तू माझी पत्नी आहेस, तू माझ्या घरी नांदायला ये, नाहीतर तुमच्या घरावर जादूटोणा करून तुमचे घर उदध्वस्त करून टाकेल अशी धमकी दिली, अशी फिर्याद पीडितेने पारनेर पोलीस ठाण्यात दिली होती. त्यानुसार भोंदूबाबावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## राहुरीत अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

ब्रास वाळू व तीन लाख रुपये किमतीचा टाटा कंपनीचा टेम्पो असा एकूण तीन लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोघांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार भगवान थोरात, रमीजराजा आत्तार, प्रकाश मांडगे, विशाल तनपुरे, चालक उत्तरेश्वर मोराळे यांच्या पथकाने केली.

## पती व सावत्र मुलाकडून बेदम मारहाण!

शैलेशने लोखंडी पान्ह्याणे संगिता यांना बेदम मारहाण केली. तसेच पती बाबाजी व अनोळखी मित्राने लाथाबुक्क्यांनी मारले.मारहाण सुरू असतानाच राहुलने संगिता यांचा मोबाईल आणि शैलेशने गळ्यातील सोन्याचे पोत जबरदस्तीने हिसकावून घेतले. गाव सोडून गेली नाहीस, तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकीही त्यांनी दिली. संगिता चक्कर येऊन पडल्यानंतर त्यांची मुलगीने त्यांना रुग्णवाहिकेतून आधी टाकळी ढोकेश्वर व नंतर अहिल्यानगर सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेले. त्रास वाढल्याने सध्या त्यांना हराळ हॉस्पिटलमध्ये दाखल केले असून, पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.